ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION
## RESEARCH REVIEW

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner

Govt. College of Arts & Science
Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Issue : XXI, Vol. II
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
June 2021 To Nov. 2021

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Universal Basic Income (UBI) :A Conversation With & Within the Mahatma<br>**Dr. Nilam Chhangani** | 1 |
| 2 | Improving Quality of Higher Education in India: An Overview<br>**Dr. Balaji G. Kamble** | 8 |
| 3 | भारतातील शेतकरी आत्महत्यांची कारणे व उपाय<br>**कल्याण सर्जेराय घोडके** | 19 |
| 4 | सिरसाळा गायातील विटभट्टी कामगारांच्या समस्याचा अभ्यास<br>**प्रियंका तुकाराम काळे** | 26 |
| 5 | बुलडाणा जिल्ह्यातील आंगणवाडी सेविकांची कुपोषण निर्मुलनातील भूमिका<br>**डॉ. वैशाली रा. मोरे** | 30 |
| 6 | जलाशयातील अप्रतिम मंदिर स्थापत्य -कंकालेश्वर मंदिर, बीड<br>**डॉ. प्रशांत अ. साबळे** | 38 |
| 7 | संगीत कलेतील सौंदर्यशास्त्र<br>**डॉ. वैशाली देशमुख** | 46 |
| 8 | दलित साहित्य : एक सांस्कृतिक क्रांतिसंदर्भ<br>**डॉ. मोहन श्रीरंग कांबळे** | 50 |
| 9 | आपत्ती व्यवस्थापन आणि लोकप्रशासन<br>**डॉ. केशव तिडके** | 55 |
| 10 | देशाच्या अंतर्गत सुरक्षेस दहशतवाद एक धोका<br>**राजेश गायकवाड** | 59 |



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Scanned with CamScanner

Issue : XXI, Vol. III
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
June 2021 To Nov. 2021


7

# संगीत कलेतील सौंदर्यशास्त्र

**डॉ. वैशाली देशमुख**
संगीत विभाग,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद, जि. औरंगाबाद

## Research Paper - Music

भारतीय सांस्कृतिक परंपराही पूर्णपणे कलेमध्ये सामावलेली दिसून येते. भारतीय सांस्कृतिक परंपरेला अतिशय प्राचीन वारसा आहे. मानवी जीवनात मानवाच्या जन्मासोबतच कलेचा जन्म देखील झाला असे म्हटलेतर अतिशयोक्तीहोणार नाही. भारतीय संस्कृतीमध्येसंगीत कलेची उपासना अतिशय प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. संगीतकलेची महती आणि पावित्र्य दर्शविण्यासाठीसंगीत कलेची उत्पत्ती स्थान भगवान शंकराकडे दिले गेले. यावरून अतिप्राचीन काळीसंगीताची उत्पत्ती देवदेवतांपासून मानली गेली. परंतू आधुनिक काळातील या विज्ञानयुगातीलसंशोधकांनाही कल्पना न पटणारी असल्यामुळेतर्कसंगत कल्पनासांगून निसर्गाच्या सुंदर वातावरणातून मानवाने सुर, लय, ताल यांचा स्वीकार केला असावा. आणि संगीताचा उत्पत्तीस्थान निसर्गाला मानूनसंगीतकला विविध वातावरणातून विकसित होत गेली. पृथ्वीतलावर असा एकही मनुष्यसापडणारा नाही ज्याला कोणत्याही कलेची आवड नाही. म्हणूनच भर्तृहरीच्या नीतिशतकात या विषयीचा एक श्लोक आहे.

साहित्यसंगीत विहीनः साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः।
तृणं न स्वादन्नपि जीवमानः तद्भागधेयं परमं पशूनाम ।

थोडक्यात मानवी जीवनाशी कलांचा अतिशय जवळचा संबंध आहे. भारतीय तत्वज्ञानात चौसष्ट कला आणि सहा शास्त्रांचा उल्लेख आढळतो. त्यामध्येसंगीत कलाही सर्वश्रेष्ठ कला मानली आहे. आणि ही एकमेव कला मानवाच्या भावना प्रगटीकरणाच्या दृष्टीने अगदीं जवळची कला मानली जाते. जिथे कला विकसित होते, त्याबरोबर त्याचे शास्त्रही विकसित होते.

आज संगीत कलेने विकासाचा परमोच्च बिंदू गाठला आहे. आपण आधी कला म्हणजे कायते बघू. ज्या प्रयत्नांमुळे, किंवा ज्या गोष्टींमुळे एखादी घटना, माहिती, कृती अथवा वास्तू सुंदरहोते त्याला कला असे म्हणतात. मानवी अनुभूतीची सौंदर्यात्मक अभिव्यक्ती म्हणजे कला, प्रत्येक कलाही निसर्गनिर्मित असते, मानवनिर्मित असते. संगीताचेसौंदर्यशास्त्र म्हणजे कलेच्या सौंदर्यतत्वांचा अभ्यास.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with CamScanner

टॉलस्टॉय यांनी कलेविषयी पुढील विचार मांडलेले आहेत. मानवी अनुभवाच्या देवाण घेवाणीचा एक मार्ग आहे. शब्दांच्याद्वारे एकाकडून दुसऱ्याकडे विचार संक्रमित होतात. त्याप्रमाणे कलेच्या द्वारा भावना संक्रमित होतात. आपला भावनानुभव दुसऱ्यांना मिळावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो, त्यावेळी कला निर्माण होते. कलाही केवळ बुद्धीचा विषय नाही, ती भावनेची अभिव्यक्ती आहे.

Aestheticsसौंदर्यशास्त्रहाशब्दमुळग्रीकभाषेतीलआहे. ज्याचेमुळरूपAsthesisअसेआहे. नंतरतोशब्दAsthesis असा झाला. याचा अर्थ अनुभव करणे, मन व इंद्रिय सुखाची चेतना, असा होतो. भारतीय कलाचिंतनातसौंदर्यशास्त्रहा आधुनिक युगातील शब्द आहे. परंतू भरताच्या काळात यालाच 'अलंकारशास्त्र' असे म्हणत. भारतीय संगीततज्ज्ञांनी रससिद्‌धीचे तत्व मांडलेतर पाश्चात्य संगीत तज्ज्ञांनीसौंदर्यनिर्मितीहे तत्व मांडले; परंतू सर्व कलांच्या निर्मितीनंतरसौंदर्याची अनुभूती होतेच आणि त्यातून रसोत्पत्तीहोतेच म्हणून या दोनही गोष्टी एकाच घटकाची दोन नावे असावीत असे वाटते. डॉ.नगेंद्र यांच्या मतेसौंदर्यशास्त्र म्हणजे ललित कलांमधून निर्माण होणाऱ्या, अभिव्यक्त होणाऱ्या सौंदर्य विषयक प्रश्नांचे तात्विक विवेचन आणि त्याच्यापासून निर्माण होणाऱ्या सौंदर्य सिद्धांतांचीसंहीता.

मर्ढेकर यांच्या मतेAll arts aspsire to the stage of music. Encyclopedia defines Arts as - Art is an expression of emotions and creative imaginations in terms of line, form, colour, sound or gesture and rhythmic movements.

के.सी.पांडे यांच्या मतेThe word Aesthetics stand for science and philosophy of fine arts.

सौंदर्यशास्त्र यात सौंदर्य + शास्त्र असे शब्द येतात. सौंदर्यशास्त्र म्हणजे संवेदनांचे शास्त्र. कलानिर्मिती व तिचा आस्वाद अशा दोन्ही प्रक्रिया जिथे पूर्णहोतात, तेसौंदर्यहोय. हेसौंदर्यशास्त्रात येते. रशियन लेखक इव्हान ऑस्टरनोव्ह म्हणतात की, स्वतःला सौंदर्यअनुभव येणे, व ते अनुभव कला माध्यमातून व्यक्त होणे व रसिकांकडूनत्याचे आस्वादन होणेहे सर्व संगीताच्या सौंदर्यशास्त्रात समाविष्ट आहे. कांटे असे म्हणतातBeauty is the king of universal delight.

हेगेल यांच्या मते"The philosophy of Rine Arts' ग्रंथात असे म्हटले आहे की, सौंदर्यशास्त्राचा संबंध ललितकलांच्या माध्यमातून अभिव्यक्त होणाऱ्यां कलाकृतीच्या सौंदर्याशी येतो आणि म्हणून ललितकलांचे दर्शन म्हणजेसौंदर्यशास्त्रहोय.

संगीताचेसौंदर्यशास्त्र म्हणजे ज्यात संगीताचे स्वरूप, त्याची अंतर्गत रचना, संगीतकला म्हणजे काय? कलेच्या निर्मितीची प्रक्रिया, त्यातील कलावंताची मानसिक प्रक्रिया यासारख्या प्रश्नांचा अभ्यास केला जातोतेसंगीताचेसौंदर्यशास्त्रहोय.

भारतीय साहित्यात आणि कलांमध्ये अनेक सौंदर्यमूल्यांचे विश्लेषण प्राचीन काळापासून केलेले आढळून येते. प्राचीन ग्रंथकारांनी अनेक ग्रंथांमध्ये अनेक सिद्धांत मांडले. रसासिद्धांत पं.भरतमूनींनी

College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with CamScanner

Issue : XXI, Vol. III
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
June 2021 To Nov. 2021

तिसऱ्या शतकात लिहिलेल्या ग्रंथामध्ये मांडलेला आहे. सहाव्या अध्यायात रसाध्याय मांडून भरतमुनी म्हणतात, नाट्य म्हणजेच रस. काव्याचा अर्थ 'रसो वै सा' असे उपनिषदात म्हटले आहे. रस म्हणजे चव किंवा आनंद. सर्व सृष्टीतील रस म्हणजे आनंदमय परमेश्वर होय. पं.भरतमुनींनी व अभिनव गुप्तांनी एकूण नऊ रस मानले आहेत. माणसाच्या मनातील भाव-भावनांचा होवून जो भाव निर्माण होतो त्यालाच रस म्हणतात. प्राचीन काळातील वाल्मिकी, भरत, कालीदास, अभिनव गुप्त, कबीर, सूरदास, मीराबाई, तुलसीदासतसेच मतंग, नारद, शारंगदेव, अमीर खुसरो, सदारंग-अदारंग पासून आधुनिक काळातील पं.भातखंडे, पं.पलुस्कर, पं.रविशंकर, पं.भीमसेन जोशी इ. अनेकसंगीत तज्ज्ञांनी व महान कलाकारांनीसंगीतातीलसौंदर्य अनुभवले आणि ते आपापल्या पद्धतीने अभिव्यक्त केले. कलाही माणसाला सौंदर्याचा अनुभव देते आणि तो अनुभव अद्वितीय व विलक्षण असाच असतो. निसर्गात असलेल्या अनेक चेतना, भावना यांचा अनुभव आपल्याला काही विशिष्ट राग ऐकल्यानंतर येतो. उदा. भैरवी सारखा राग ऐकल्यानंतर आपल्याला विरह, व्याकुळता अनुभवायला मिळते. देस-मल्हारसारखा राग ऐकल्यानंतर वेगवेगळ्या पाणी पडणाऱ्या झऱ्यांचा अनुभव होतो. याचे मुख्य कारण कलेमुळे आपल्याला त्या सौंदर्याची अनुभूती होते.

मुळात कोणत्याही कलेतसौंदर्यहे उपजतच असते. कलेचे महत्त्वाचे लक्षण म्हणजेसौंदर्य. संगीत कलेला भावनात्मक जीवनाचे प्रतिक मानले आहे. भावनात्मक प्रवृत्ती म्हणजेसुखदुःखादी विविध मनोविकार अनुभवण्याची शक्तीहासौंदर्यशास्त्राचा मुलाधार आहे. मनुष्यहा स्वभावतःच सौंदर्यप्रिय आहे. प्रत्येक मनुष्यालासौंदर्याची ओढ असते. ते अनुभवण्याची शक्तीही त्याच्यात असते; पण तीसौंदर्याची ओढ कलावंतामध्ये थोड्या प्रमाणात जास्त असते. म्हणूनच कलावंत त्या सौंदर्याचा अनुभव घेवून दुसऱ्यांनाही देण्याचा प्रयत्न करीत असतो. संगीत कलाही मनुष्याच्या मनाच्या अगदी जवळची कला असल्यामुळे त्या कलेचेसौंदर्य आणि त्याचे शास्त्र प्राचीनकाळापासून लिखित स्वरूपात अस्तित्वात आहे. परंतूत्याची नावे वेगवेगळ्या रूपात लिहिल्या गेली. कलानिर्मिती मधीलसौंदर्य कसे असते व त्यासाठी कोणते घटक आहेतते आपण बघू.

१) कलेतीलसौंदर्यहे इंद्रियगम्य आहे.
२) कलेचा गुण अद्वितीयता, अनन्यसाधारणता.
३) कल्पनांचा अनुभव सौंदर्यपूर्ण प्रस्तिकरणातून देणे.
४) संगीत माध्यमामधून कलाकारश्रोत्यांना बांधून ठेवतो.
५) संगीतहे सर्व कलांमधील दुवा आहे.
६) संगीत कलेला प्रतिसादासाठी रसिकांची आवश्यकता असते.
७) संगीतहे सर्व भावभावनांचे प्रस्तुतीकरणाचे मंजूळ गोड असे महत्त्वपूर्ण साधन आहे.

हे सर्व घटक असल्यामुळेसंगीतातीलसौंदर्य व शास्त्राचा एक उत्तम कलाकार अभ्यास करीत

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with CamScanner

असतो आणि अनेक विविध संगीतातील पैलूसौंदर्यात्मक प्रस्तुतीकरणात घेवून त्याचा अनुभव रसिक श्रोत्यांबरोबर स्वतःही घेवून वेगळ्या भावविश्वात जातो.

समाजाला सौंदर्यात्मकता, कलात्मकता अनुभवास देण्यासाठीसंगीततज्ज्ञ, संगीत सेवा करणारे कलाकार अनुभूती देतात आणि खूप मोठीसांस्कृतिक परंपरा जतन करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

## संदर्भ सूची :-

१) संगीत विशारद - वसंत
२) संगीतशास्त्र - मोहन मार्डीकर
३) संगीतशास्त्र विज्ञान - डॉ.सुचेता बीडकर
४) हिंदुस्थानातीलसंगीत पद्धती - प्रा.डॉ.बाळ पुरोहीत
५) साहित्य और सौंदर्यबोध - डॉ.मुकेल गर्ग
६) रागदारीसंगीतातीलसौंदर्यस्थळे - रोचना भडकमकर

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Scanned with CamScanner